क्रमांक : ३६.

# महाराष्ट्र विधानसभा

## पत्रक भाग दोन

## सोमवार, दिनांक १३ मे, २०२४/ वैशाख २३, शके १९४६.

## लक्षवेधी सूचनांवरील प्रलंबित निवेदनांच्या प्रतींचे वितरण

३६. सर्व सन्माननीय विधानसभा सदस्यांना कळविण्यात येते की, विधानसभेचे सन २०२३ चे व्दितीय (पावसाळी) अधिवेशन सोमवार, दिनांक १७ जुलै, २०२३ रोजी विधान भवन, मुंबई येथे सुरु होऊन शुक्रवार, दिनांक ४ ऑगस्ट, २०२३ रोजी संस्थगित झाले.

संस्थगित झालेल्या व्दितीय सत्रात एकूण २३५ स्वीकृत लक्षवेधी सूचनांचे जोडपत्र दिनांक ४ ऑगस्ट, २०२३ रोजी सभागृहाच्या पटलावर ठेवण्यात आले होते. २३५ निवेदनांपैकी ९२ निवेदने सोमवार, दिनांक २८ ऑगस्ट, २०२३ रोजीच्या पत्रक भाग-२ क्रमांक १२१ अन्वये मा.सदस्यांना वितरीत करण्यात आली होती. प्रलंबित १४३ निवेदनांपैकी ४८ निवेदने गुरुवार, दिनांक २१ सप्टेंबर, २०२३ रोजीच्या पत्रक भाग-२ क्रमांक १२३ अन्वये मा. सदस्यांना वितरीत करण्यात आली होती. प्रलंबित ९५ निवेदनांपैकी ३० निवेदने गुरुवार, दिनांक २१ सप्टेंबर, २०२३ रोजीच्या पत्रक भाग-२ क्रमांक १३३ अन्वये मा. सदस्यांना वितरीत करण्यात आली होती. एकूण ६५ निवेदनांपैकी ७ निवेदने सोमवार, दिनांक २० नोव्हेंबर, २०२३ रोजीच्या पत्रक भाग-२ क्रमांक १३८ अन्वये मा. सदस्यांना वितरीत करण्यात आली होती. आता एकूण ५८ निवेदनांपैकी १३ निवेदने सोमवार, दिनांक १९ फेब्रुवारी, २०२४ रोजीच्या पत्रक भाग-२ क्रमांक ५ अन्वये मा.सदस्यांना वितरीत करण्यात आली होती. एकूण ४५ निवेदनांपैकी ०२ निवेदने शाखेत प्राप्त झाली असून ती यासोबत वितरीत करण्यात येत आहेत.

**विधान भवन,**
**मुंबई,**
**दिनांक : १३ मे, २०२४**

**जितेंद्र भोळे**
**सचिव-१ (कार्यभार),**
**महाराष्ट्र विधानसभा.**

याची प्रत :

१. महाराष्ट्र विधानसभेचे सर्व सन्माननीय सदस्य.
२. महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालयातील सर्व पक्ष कार्यालये.
३. संगणक कक्ष (website.)
४. अनुवाद कक्ष
५. प्रतिवेदन

**महाराष्ट्र विधानसभा**
**सन २०२३ चे दुसरे (पावसाळी) अधिवेशन**

**लक्षवेधी सूचना क्रमांक - १४१२**

**श्रीमती जयश्री जाधव, वि.स.स. यांनी महाराष्ट्र विधानसभा नियम - १०५ अन्वये उपस्थित केलेली लक्षवेधी सूचना पुढीलप्रमाणे आहे :-**

"कोल्हापूर महानगरपालिकेमार्फत महाराष्ट्र सुवर्ण जयंती नगरोत्थान महाअभियान (राज्यस्तर) योजनेंतर्गत नागरी दळणवळण साधनांचा विकास या अंतर्गत कोल्हापूर महानगरपालिका हद्दीमधील रस्ते, गटार, भुयारी मार्ग व फुटपाथ करण्याच्या कामांकरिता सादर करण्यात आलेल्या १०० कोटींच्या प्रस्तावास तांत्रिक मंजुरी मिळाली असणे, परंतु सदरची माहिती राज्य नियोजन मंडळाचे कार्यकारी अध्यक्ष यांनी दिनांक रोजी पत्रकार परिषद घेऊन प्रसिध्द मिळवण्याचा प्रयत्न केला असणे, सदर निधी मिळावा यासाठी दिवंगत स्थानिक लोकप्रतिनिधीकडून शासनाकडे अनेकदा मागणी केलेली असणे, परंतु जनतेने नाकारलेला व्यक्तींना उपरोक्त निधी प्रकरणी श्रेय घेतल्याच्या प्रकारामुळे, महिला लोकप्रतिनिधींच्या हक्कांवर गदा आणण्याचा प्रयत्न काही स्थानिक प्रशासन अधिकारी यांना हाताशी धरुन सदर उपरोक्त मोहदय यांनी केला असणे असे एकदा नव्हे तर या पूर्वी देखील अनेकदा कोल्हापुर शहरासाठी शासनाने विविध योजनेच्या विकास कामासाठी दिलेल्या निधीचे श्रेय समाज माध्यमामध्ये, जाहीर पत्रकार परिषदेत अनेकदा उपरोक्त सदर महोदयांनी घेतला असणे, त्यामुळे त्यांनी भारतीय संविधानाच्या विरोधात कृत्य केले असल्याने व त्याबाबतचे सर्व पुरावे असणे, त्यामुळे शासनाने सदर घटनेची सविस्तर चौकशी करुन स्थानिक प्रशासन अधिकारी यांचेवर ही हक्कभंगाची कारवाई करण्याची जनतेतून मागणी असणे, तसेच स्थानिक लोप्रतिनिधी यांचे शहरातील विकासकामे करतांना त्यांच्या हक्कावरती गदा आणण्याचे प्रयत्न जाणून बुजून काही नाकारलेले लोकप्रतिनिधी हे राजरोज पणे करीत आहेत, त्यामुळे त्यांच्यावर असणाऱ्या राज्य नियोजन मंडळाच्या कार्यक्षेत्रात बाहेर जाऊन कोल्हापूर शहरातील विकासकामात होणाऱ्या त्यांच्या नाहक हस्तक्षेपामुळे कोल्हापूर उत्तर विधान सभा क्षेत्रातील सर्वसामान्य जनतेची फार मोठे विकास कामे थांबलेली असणे, त्यामुळे शासनाने तातडीने त्यांचेवर कारवाई करुन सदर महोदय यांना तात्काळ त्यांच्या पदावरुन कमी करावी अशी स्थानिक रहिवाशी यांची प्रमुख मागणी असणे, परंतु उपरोक्त प्रकरणी शासनाने अद्याप कोणतीही कारवाई केली नसल्याने, कोल्हापूर शहरातील जनतेत शासनाच्या विरोधात तीव्र संतापाची भावना निर्माण झाली असणे, परिणामी शासनाने तातडीने करावयाची कार्यवाही किंव्हा उपाययोजना."

-: **मा. मुख्यमंत्री महोदयांचे निवेदन** :-

महाराष्ट्र सुवर्ण जयंती नगरोत्थान महाभियानांतर्गत कोल्हापूर शहराच्या रुपये १००.३३ कोटी किंमतीच्या रस्ते विकास प्रकल्पास दिनांक २४ एप्रिल, २०२३ रोजीच्या शासन निर्णयान्वये प्रशासकीय मंजुरी प्रदान करण्यात आलेली आहे. सदर प्रकल्पाच्या मंजुरीच्या अनुषंगाने कोल्हापूर महानगरपालिकेमार्फत कोणत्याही पत्रकार परिषदेचे आयोजन करण्यात आलेले नाही. तसेच, सद्यस्थितीस सदर प्रकल्पाची निविदा प्रक्रिया राबवून सदर प्रकल्पाचे कार्यादेश कोल्हापूर महानगरपालिकेमार्फत देण्यात आलेले आहेत.

*****

el.

<u>गृह विभाग</u> <u>लक्षवेधी सूचना क्र. १५०१</u>

**महाराष्ट्र विधानसभा**

**सन २०२३ चे द्वितीय अधिवेशन**

**मा. श्री. नितेश राणे, विधानसभा सदस्य यांनी महाराष्ट्र विधानसभा नियम १०५ अन्वये दिलेली लक्षवेधी सूचना पुढीलप्रमाणे आहे :-**

" दिल्लीला लागून असलेल्या गाझियाबादमध्ये ऑनलाइन गेमिंगच्या नावाखाली धर्म परिवर्तनाचा प्रकार उघडकीस आला असणे, गाझियाबादमधील कविनगर येथील १७ वर्षीय मुलाचे धर्मांतर करणाऱ्या मौलवी अब्दुल रहमान उर्फ नन्नी याला पोलिसांनी अटक केली असणे, पोलिसांच्या चौकशीत अब्दुल रहमानने अल्पवयीन मुलांवर कट्टरतावाद केल्याची कबुली दिली असणे, रहमान याने ऑनलाइन गेमच्या माध्यमातून धर्मपरिवर्तन घडवल्याचा आरोप केला असणे, अब्दुल रहमान आणि महाराष्ट्रातील मुंब्रा (जि. ठाणे) येथील शाहनवाज मकसूद यांनी हा प्रकार केल्याचा दावा पोलिसांनी केला असणे, सदर घटनेचे धागेदोरे, महाराष्ट्रातील मुंब्रा (जि. ठाणे) शहरापर्यंत असल्याची माहिती समोर आली असणे, आरोपी रहमान याने दिलेल्या माहितीनुसार या प्रकरणातील दुसरा आरोपी हा ठाण्यातील मुंब्रा येथील असणे, त्यामुळे गाजियाबादची पोलिसांची एक टीम मुंब्रामध्ये दाखल झाली असणे, स्थानिक मुंब्रा पोलिसांच्या मदतीने शहानवाज नामक आरोपीचा शोध सुरु असणे, शहानवाज गेल्या आठ दिवसांपासून आपल्या घरी येत नसल्याचं आजूबाजूच्या सर्वच शेजाऱ्यांनी पोलिसांना सांगण्यात येणे, गाझियाबादमध्ये ऑनलाइन गेमिंगच्या नावाखाली धर्म परिवर्तनाचा प्रकारावर बोलताना मुंब्रा विधानसभा क्षेत्रातील लोकप्रतिनिधींनी यांनी ४०० मुलांचे धर्मांतर प्रकरण म्हणजे मुंब्राला बदनाम करण्याचे काम असून केवळ सनसनाटी निर्माण करण्यासाठी हा प्रकार केला जात असणे असे व्यक्तव्य केले असणे, या माध्यमातून मुंब्रा शहराला बदनाम केले जात असणे, ही घटना खरी नाही. या घटनेचे खंडन पोलिसांनी करायला हवे. राज्यातील निवडणुका जिंकण्यासाठी हा सर्व प्रकार सुरु असून धर्मांतर करणारी चार मुले दाखवली तरी आपण राजीनामा देऊ, असे मुंब्रा विधानसभा क्षेत्रातील लोकप्रतिनिधींनी शासनाला आव्हान दिले असणे, शहनवाज मकसूद हा बड्डो नावाच्या बनावट आयडीद्वारे ऑनलाइन गेमवर उपस्थित राहत असून फोर्ट नाईट या ऑनलाइन गेममध्ये हिंदू मुलांना फसवण्याचे काम करीत असणे, हिंदू नावांची मुस्लीम मुलांचे आयडी बनवून तो स्वतः खेळत असणे, खेळ खेळताना हिंदू मुले हरले की त्याला कुराण वाचण्यास सांगत असणे, याप्रकारे मुलांचा कल इस्लाम धर्माकडे होत होत असणे, तसेच या घटनेपाठोपाठ संगमनेर येथे दिनांक १६ जून व त्या सुमारास एका उच्चशिक्षित २२ वर्षाची तरुणी ऑनलाइन गेमच्या माध्यमातून दरभंगा बिहार येथून आलेला अक्रम शहाबुद्दीन या तरुणाची ओळख करून सदर मुलीला संगमनेर येथे भेटायला येणे, आरोपी मुलाने पीडित मुलीला जोरजबरदस्ती करून बिहारला नेण्याचा प्रयत्न करणे, तसेच स्थानिक हिंदूत्ववादी कार्यकर्त्यांनी आरोपींचा पाठलाग करून होणार प्रकार थांबविला आणि आरोपीची पूर्ण माहिती काढून त्याचा फोन मध्ये असंख्य हिंदू मुलींचे नंबर असणे, त्यानंतर पोलीस स्टेशनला जाऊन गुन्हा दाखल करणे, मात्र अद्याप या मागे मुख्यसूत्रधार कोण आहे त्या मोबाइल मधील कोणतीही माहिती रेकॉर्डला न येणे, एवढी गंभीर घटना घडल्यानंतर स्थानिक मुस्लिम लोकांनी आरोपीला वकील व इतर मदत उपलब्ध

करून देणे, यासारख्या राज्यातील विविध भागांतून सदर घटना झाल्याचे निदर्शनास येत असणे, धर्मातराणाच्या अशा घटनांप्रकरणी राज्यातील लोकप्रतिनिधी व जनतेकडून तिव्र निषेद करण्यात येत असणे, यामुळे राज्यात हिंदू-मुस्लिम तेढ निर्माण होऊन दंगलसदृश्य परिस्थिती निर्माण होण्याची शक्यता निर्माण झाली असणे, याप्रकरणी शासनाने तातडीने चौकशी करुन धर्मातरण प्रकरणी कायदा करून दोषींवर कडक कारवाई करुन सदर प्रकार रोखण्याच्या दृष्टीने करावयाची कार्यवाही व प्रतिक्रिया"

*******************************************************************

**मा.उप मुख्यमंत्री (गृह) यांचे निवेदन**

गाझियाबादमध्ये ऑनलाइन गेमिंगच्या नावाखाली धर्म परिवर्तन केल्याप्रकरणी कविनगर पोलीस ठाणे, गाझियाबाद, उत्तरप्रदेश येथे दि. ३०/०५/२०२३ रोजी गु.र.क्र. ४३४/२०२३ धर्म संपरिवर्तन प्रतिषेद अधिनियम कलम ३,५ (१) प्रमाणे गुन्हा दाखल असून सदर गुन्हयाचा तपास कविनगर पोलीस स्टेशन मार्फत सुरु आहे.

उपरोक्त गुन्हयातील सह आरोपी शहानवाज मकसूद खान, वय २३ वर्ष रा. रुम नंबर ७, साजिया अपार्टमेंट, देवरीपाडा, कौसा, मुंब्रा, जि. ठाणे येथील रहिवासी असल्याने त्याच्या अटकेसाठी कविनगर पोलीस ठाणे, गाझियाबाद राज्य उत्तरप्रदेश येथील पोलीस पथक मुंब्रा पो.स्टे. येथे आले होते. सदर आरोपीच्या अटकेसाठी गाझियाबाद पोलीसांनी स्थानिक पो. स्टे. मुंब्रा कडील पोलीस मदत मागितल्याने त्यांना पोलीस मदत पुरविण्यात आली. तसेच गुन्हयाचे स्वरुप पाहता सदरचा गुन्हा हा संवदेनशील स्वरूपाचा असल्याने मुंब्रा पो.स्टे. कडील पोलीस अधिकारी व अमलदार यांचे पथक तयार करून नमुद आरोपीच्या अटकेसाठी रवाना करण्यात आले. त्यानंतर आरोपी शहानवाज मकसूद खान हा अलिबाग, कोळीवाडा येथे मिळून आल्याने त्यास दि. १०/०६/२०२३ रोजी मुंब्रा पोलीसांमार्फत ताब्यात घेण्यात आले व तदनंतर कविनगर, गाझीयाबाद पोलीस पथकाच्या ताब्यात दिल्यानंतर त्यांनी आरोपीस दि. १२/०६/२०२३ रोजी मा. न्यायालयात हजर केले. मा. न्यायालयाने त्यास दि. १५/०६/२०२३ पर्यंत ट्रान्झीट रिमांड कस्टडी मंजूर केली.

सदर प्रकरणी कविनगर पोलीस ठाणे गाझियाबाद उत्तरप्रदेश पोलीसांकडून अधिक माहिती घेतली असता मुंब्रा पो.स्टे. हद्दीत ऑनलाइन गेमिंगच्या नावाखाली धर्म परिवर्तनाची एक ही घटना घडलेली नाही. ऑनलाईन गेमिंग मार्फत धर्मपरिवर्तन झालेबाबत मुंब्रा पो.स्टे. येथे कोणताही अर्ज अगर तकार प्राप्त नाही. तरी ठाणे शहर पोलीस आयुक्तालयाचे हद्दीत अशाप्रकारची घटना निदर्शनास आल्यास अगर तकार प्राप्त झाल्यास प्रचलित कायदयाप्रमाणे योग्य ती कारवाई करण्याची तजवीज ठेवण्यात आली आहे.

H-1640-1A

संगमनेर प्रकरणी आरोपी मोहम्मद अक्रम शहाबुद्दीन शेख, वय २२ वर्ष, रा. अलीनगर, जि. दरभंगा राज्य बिहार हा दि. १६/०६/२०२३ रोजी संगमनेर येथे फिर्यादी मुलीला भेटण्यासाठी सह आरोपी मोहम्मद नेमतुल्लाह मोहम्मद कैस, वय २४ वर्ष, रा. इमामगंज अलीनगर जि. दरभंगा बिहार याच्यासोबत मालपाणी रिसॉर्ट येथे आलेले होते. आरोपी मोहम्मद अक्रम शहाबुद्दीन शेख याने फिर्यादी मुलीला लग्नाबाबत तसेच पळून जाण्याबाबत विचारल्यानंतर मुलीने त्यास नकार दिला. त्यानंतर अक्रम फिर्यादी मुलीला बळजबरीने ओढून नेत असताना फिर्यादी मुलीने मोठ मोठ्याने ओरडण्यास सुरुवात केल्यामुळे आसपासच्या लोकांनी दोन्ही आरोपींना तेथेच पकडून ठेवले व पोलीसांना फोन करुन बोलावले. पोलीसांनी तात्काळ घटनास्थळी पोहोचून आरोपींना ताब्यात घेवून पोलीस स्टेशनला आणले. उपरोक्त आरोपीविरूद्ध संगमनेर शहर पो.स्टे. येथे गु.र.क्र. ४३४/२०२३ दाखल करण्यात आला असून आरोपीविरूद्ध योग्य ती कायदेशीर कारवाई केली आहे.

यातील आरोपीच्या फोन मध्ये असंख्य हिंदू मुलीचे मोबाईल नंबर आहेत अशी बातमी सोशल मिडीयावर प्रसिदध झालेली होती परंतु सदरची माहिती खरी नाही. कारण सदर आरोपीचे मोबाईल फोन पोलीसांनी ताब्यात घेतले असुन त्यातील कॉन्टॅक्ट लिस्ट, व्हॉटसअप व इतर माध्यमांची बारकाईने तपासून खात्री केली असुन त्यात फिर्यादी व आरोपीचे संपर्काशिवाय इतर कोणत्याही हिंदु मुलीचे संपर्क अथवा आक्षेपार्ह माहिती तपासात आढळुन आलेली नाही. तसेच या घटनेमागील मुख्य सुत्रधार कोण आहे अगर कसे याबाबत पोलीसांनी सखोल तपास केला असुन आरोपीच्या गुन्हयातील सहभागा व्यतीरिक्त इतर कोणीही सुत्रधार निष्पन्न झालेला नाही. त्याचप्रमाणे स्थानिक मुस्लीम लोकांनी आरोपींना वकील व इतर मदत उपलब्ध करुन दिल्याचेही पोलीसांना आढळुन आले नाही. आरोपींचा जामीन अर्ज मा. अति सत्र न्यायालय, संगमनेर यांनी नामंजुर केलेला असुन दि. २०/०६/२०२३ रोजी आरोपींना न्यायालयीन कस्टडी देण्यात आली आहे. आरोपींचा जामीन अर्ज नामंजूर व्हावा या करीता पोलीसांनी योग्य तो कायदेशीर पाठपुरावा केलेला आहे.

----****------

H-1640-2